# निवेदन

मी या निवेदनाद्वारे जाहीर करते की, "Work Of Arya Samaj In Kolhapur" हा प्रबंध माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. अरुण भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वत: लिहिला असून सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विषयातील एम्. फिल्. पदवीसाठी सादर केला आहे.

( अर्चना श्रीराम जाधव )

अभ्यासक

स्थळ : कोल्हापूर.

दिनांक : ०४ डिसेंबर, २००१.

# प्रमाणपत्र

कु. अर्चना श्रीराम जाधव यांनी इतिहास विषयातील एम्. फिल्. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांजकडे सादर करावयाचा ' Work Of Arya Samaj In Kolhapur ' हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. सदर प्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठास पदवी किंवा पदविकेसाठी सादर केलेला नाही. कु. जाधव यांनी लिहिलेला प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारित आहे.

( डॉ. अरुण भोसले )

संशोधन मार्गदर्शक
इतिहास विभाग प्रमुख,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

स्थळ : कोल्हापूर.

दिनांक : ०४ डिसेंबर २००९

# प्रस्तावना

आधुनिक भारताच्या इतिहासात १९ वे शतक म्हणजे नव्या युगाची सुरुवात होय. कारण या शतकात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडून आले. या शतकात इंग्रजांमुळे, इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांना पाश्चात तत्त्वज्ञान, तंत्रज्ञान, इतिहास, कला, शास्त्रे यांचा परिचय झाला. पाश्चात्य शिक्षणाने जागृत झालेला वर्ग आत्मपरीक्षण करु लागला, पाश्चात्य शिक्षणाने त्यास नवी दृष्टी लाभली त्यावेळी आपल्या सामाजिक, राजकीय, धार्मिक जीवनातील उणिवा त्यांच्या लक्षात आल्या. जुन्या रुढी, परंपरा, अंधश्रद्धा नष्ट झाल्याशिवाय सामाजिक सुधारणा होऊ शकणार नाहीत असे सुशिक्षितांना वाटू लागले. त्यातून अनेक धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळी उदयास आल्या. त्यांनी भारतीय समाजसुधारणेच्या कामास हात घातला. सर्व प्रथम राजा राममोहन रॉय यांनी धार्मिक परिवर्तनाचे कार्य सुरु केले. त्यांनी बंगालमध्ये स्थापन केलेल्या ब्राह्मो समाजामुळे भारतामध्ये सामाजिक व धार्मिक क्षेत्रात परिवर्तनाचे एक नवे पर्व सुरु झाले. ब्राह्मो समाजापासून प्रेरणा घेवून भारताच्या निरनिराळ्या भागात विविध सुधारणा संघटना निर्माण झाल्या. उत्तर भारतात विशेषत: पंजाब, राजस्थान, गुजराथ, संयुक्त प्रांत इत्यादी ठिकाणी स्वामी दयानंदानी स्थापन केलेल्या आर्य समाजाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला.

आधुनिक भारताच्या धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळीच्या इतिहासात आर्य समाजाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. आर्य समाजाने हिंदू धर्मातील दोष दूर करुन त्यास शुद्ध स्वरुप प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केला, वैदिक धर्माचा प्रसार केला. आर्य समाजाचा प्रसार उत्तरेत जास्त झाला. आर्य समाजाची तत्त्वे दक्षिणेतील प्रांतात फारशी रुजली नाहीत. आर्य समाजाचे उत्तरेतील शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक कार्य पाहून

कोल्हापूर संस्थानचे पुरोगामी अधिपती राजर्षी शाहू महाराज आर्य समाजाकडे आकर्षित झाले. त्यांनी विशिष्ट वर्गाची धार्मिक मक्तेदारी नष्ट करण्यासाठी आणि सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी इ. स. १९१८ मध्ये कोल्हापूरात आर्य समाजाची स्थापना केली. कोल्हापूरात आर्य समाजाने शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात मोठे कार्य केले आहे.

कोल्हापूरातील आर्य समाजाची चळवळ हा विषय मी संशोधनासाठी निवडला हा केवळ योगायोग होता. स्थानिक विषय संशोधनासाठी घ्यावा असे सुरुवातीपासून मला वाटत होते. तेव्हा माझे मार्गदर्शक डॉ. अरुण भोसले यांच्याशी मी विविध विषयांवर चर्चा केली. त्यांनी मला या विषयाबद्दल सुचविले. सुरुवातीस शाहू महाराज व आर्य समाज हा विषय संशोधनासाठी घेण्याचे ठरवून मी त्यादृष्टीने वाचन करण्यास सुरुवात केली. तेव्हा कोल्हापूरात आर्य समाजाने शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे हे लक्षात आल्यावर मला कोल्हापूरातील आर्य समाजाच्या कार्याचा सविस्तर अभ्यास करावा असे वाटू लागले. १९ व्या व २० व्या शतकांत ज्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी उदयास आल्या, त्यांनी केलेले समाजसुधारणेचे कार्य तत्कालीन परिस्थितीत खुपच मोलाचे ठरले. कोल्हापूरातील आर्य समाजाने केलेल्या कार्याविषयी सविस्तर अभ्यास झालेला नव्हता. म्हणून मी माझ्या एम्. फिल्. पदवीसाठी ' कोल्हापूरातील आर्य समाजाचे कार्य' याच विषयावर शोधप्रबंध लिहायचा निश्चय केला. माझे संशोधन मार्गदर्शक व शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अरुण भोसले यांनीही मला हा विषय निवडण्याबाबत उत्तेजन दिले. आर्य समाजाच्या कार्याबाबत कोणी काही संशोधनात्मक कार्य केले आहे का ?असेल तर त्याचे स्वरुप काय आहे ? आपणास काय करावे लागेल ? याची शोधाशोध सुरु झाली. तेव्हा डॉ. बी. डी. खणे यांनी ' Shri Shahu A Study Of Socio – Political Reforms ( 1884 – 1922 )' या विषयांवर शिवाजी विद्यापीठास पी. एच्. डी.

पदवीसाठी सादर केलेला प्रबंध व श्री. टी. एस्. पाटील यांनी ' कोल्हापूर संस्थानातील सामाजिक व राजकीय चळवळीचा एक अभ्यास ( १९२२ - १९४० )' हा शिवाजी विद्यापीठास १९८९ मध्ये एम्. फिल्. पदवीसाठी सादर केलेला प्रबंधही माझ्या वाचनात आला. त्यामध्ये त्यांनी आर्य समाजाचा थोडक्यात आढावा दिलेला आहे. परंतु आर्य समाजाच्या कार्याविषयी सविस्तर चर्चा त्यात केलेली नाही. प्रस्तुत विषयावर संशोधनात्मक लिखाण फारसे झाले नसल्याचे आढळल्याने मी माझ्या संशोधन कार्यास प्रारंभ केला. तथापि प्रत्यक्षात अभ्यासास उपयुक्त ठरणारी तत्कालीन कागदपत्रे कोल्हापूर आर्य समाज संस्थेकडे मिळाली नाहीत हे खेदाने नमूद करावे लागते.

प्रस्तुत प्रबंधासाठी मला कोल्हापूर पुराभिलेखागारमधून अनेक ठराव बुक व गॅझेट, शाहू महाराजांची पत्रे उपलब्ध झाली. त्यातून आर्य समाजाबाबतची उपयुक्त माहिती उपलब्ध झाली. तर आर्य समाजाच्या कार्याचा इतिवृतांत देणारे अहवाल आर्य समाज संस्थेतील श्री. भोसले यांच्याकडून उपलब्ध झाले. तसेच वृत्तपत्रे, नियतकालिके, आर्य समाजविषयक माहिती देणारी प्रकाशित साधने यांचा उपयोग प्रस्तुत प्रबंधाच्या लेखनासाठी केला आहे. हा प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही प्रकारच्या साधनांच्यावर आधारीत आहे.

' कोल्हापूरातील आर्य समाजाचे कार्य ' या माझ्या शोधप्रबंधात कोल्हापूरातील आर्य समाजाच्या समग्र कार्याचा आढावा घेतलेला आहे.

प्रस्तुत प्रबंधामध्ये चार प्रकरणे पाडण्यात आली असून शेवटी समारोप करण्यात आला आहे. पहिल्या प्रकरणामध्ये स्वामी दयानंद सरस्वतींनी केलेली आर्य समाजाची स्थापना, आर्य समाजाची तत्त्वे, प्रसार, आर्य समाज व महाराष्ट्र, कोल्हापूरात आर्य समाजाची स्थापना कशी झाली याचा आढावा घेण्यात आला आहे.तर दुस-या प्रकरणात आर्य समाजाने बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार कशा पद्धतीने केला व त्यासाठी उभारण्यात आलेली शैक्षणिक केंद्रे याबाबतची चर्चा केली आहे. तिस-या प्रकरणामध्ये

आर्य समाजाने सामाजिक व धार्मिक क्षेत्रामध्ये केलेल्या कार्याचे विवेचन केले आहे. चौथ्या प्रकरणात आर्य समाजाच्या स्थानिक नेत्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला आहे. समारोपाच्या शेवटच्या प्रकरणात संशोधनाचे मुख्य निष्कर्ष मांडले आहेत.

अशा प्रकारे मी तयार केलेल्या या प्रबंधाचे वाचकांकडून व जिज्ञासूंकडून योग्य स्वागत होईल व त्याला दाद मिळेल असा विश्वास वाटतो.

अर्चना श्रीराम जाधव

( अभ्यासक )

# ऋणनिर्देश

‘ कोल्हापूरातील आर्य समाजाचे कार्य ’ हा विषय संशोधनासाठी निवडल्यापासून प्रस्तुत प्रबंध पूर्ण करेपर्यंत ज्या अनेक व्यक्ती व संस्था यांचे मला सहकार्य, मार्गदर्शन आणि उत्तेजन लाभले त्या सर्वांचे अंत:करणपूर्वक आभार मानणे हे मी माझे आद्यकर्तव्य समजते. कारण त्यांच्या सहकार्याशिवाय माझे संशोधन कार्य सिद्धीस गेले नसते, याची मला जाणीव आहे. सर्वप्रथम मी माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. अरुण भोसले यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानते. त्यांनी मला संशोधन विषयाची निवड व त्याचा अभ्यास याबाबत बहुमोल मार्गदर्शन केले आणि सतत उत्तेजन देवून, सदैव सहकार्य केले. त्यांची मी ऋणी आहे.

हे काम करीत असतानाच अनेक व्यक्ती, संस्था यांनी केलेले सहकार्य हे अत्यंत मोलाचे ठरले. त्यामुळेच हे काम मी पूर्ण करु शकले. शिवाजी विद्यापीठाचे बॅ. खर्डेकर ग्रंथालय, मा. सहाय्यक संचालक व स्टाफ, कोल्हापूर पुराभिलेखागार, मा. ग्रंथपाल व स्टाफ राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर, मा. ग्रंथपाल, शाहू दयानंद हायस्कूल, कोल्हापूर, दै. सत्यवादी, कोल्हापूरचे संपादक व स्टाफ यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

तसेच डॉ. बी. डी. खणे यांनी वेळोवेळी जे मार्गदर्शन दिले त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानते. श्री. व्ही. एम्. पाटील सर, शाहू दयानंद हायस्कूल, कोल्हापूर यांनी मला कोल्हापूर आर्य समाजाची सुवर्ण महोत्सव स्मरणिका उपलब्ध करुन दिली, त्याबद्दल मी त्यांचेही मन:पूर्वक आभार मानते. सध्याचे शा. कृ. पंत वालावलकर वसातिगृहाचे सुपरिटेंडेंट श्री. सदाशिव भोसले यांनी मला कोल्हापूर आर्य समाज संस्थेचे अहवाल उपलब्ध करुन दिले, ते मला अत्यंत उपयुक्त ठरले. त्यांचेही मी आभार मानते. त्याशिवाय प्रा. व्ही. एस्. पवार, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर यांनी कोल्हापूर आर्य समाजाचे एक पाक्षिक ‘आर्य’ उपलब्ध करुन दिले, त्याँचाही मला बराच उपयोग झाला. त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानते. तसेच डॉ. सौ. पद्‌मजा पाटील, श्री. सुतार, माझी मैत्रीण सौ. तृप्ती रावराणे यांनी मला जी प्रेरणा दिली त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानते. याशिवाय माझ्या इतर सर्व

मैत्रिणींचे, हितचिंतकांचे प्रोत्साहन, सहकार्य वेळोवेळी मला मिळाले. माझे आई-वडिल, बहिण कु. अश्विनी, भाऊ सचिन यांनी मला अत्यंत मोलाची मदत, प्रोत्साहन दिल्यामुळेच मी हा प्रबंध पूर्ण करु शकले. तसेच हा प्रबंध वेळेत विद्यापीठास सादर करण्यासाठी माझी बहिण कु. शैलजा व तिचे सहकारी श्री. श्रीकांत पुरोहित, श्री. जगदीश बाबर, श्री. मनोज निलवर्णे, श्री. मोहन पाटील यांनी परिश्रम घेवून कॉम्प्युटरवरील सर्व काम व्यवस्थित पूर्ण करुन दिले त्याबद्दल त्यांचेही मी आभार मानते. पुन:श्च सर्वांचे एकदा अंत:करणपुर्वक आभार मानते.

( अर्चना श्रीराम जाधव )

अभ्यासक